आर.सी.सी. क्र.४१८/२०२२

नि.क्र.२९

**सदर न्यायकक्षात पुरावा सुरु करताना सहाय्यक सरकारी अभियोक्ता, फिर्यादी व आरोपी क्र.१ तर्फे वकील हजर असुन इतर कोणेही न्यायालयात हजर नाही.**

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ यांचा पुरावा**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव – मंगल उत्तम बाबर

वय – ३५ वर्षे, व्यवसाय – गृहिणी

रा. – अहमदनगर, ह.मु. पुणे

**सरतपासणी सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एस. ए. पटेकर यांचेमार्फत**–

घटनेचेवेळी मी नगर येथील भिंगार येथे राहत होतो. त्यावेळी माझ्यासोबत माझे दोन मुले राहत होती व माझे पती सुट्टी असल्याने आले होते. आरोपी वडनेर गावात राहतात. आरोपी मयुर बाबर आर्मी मध्ये असुन तेही सुट्टी असल्याने आले होते. माझे चुलते सासरे शेजारी राहतात. घटना दि.०७/०९/२०२२ रोजी घडली त्या दिवशी आम्ही नगरला होतो मात्र वडनेर गावात त्या दिवशी आलो होतो. वडनेर गावात आम्ही सकाळी ८.०० वाजण्याच्या सुमारास त्या दिवशी पोहोचलो होतो. वडनेर गावात माझे पतीचे घर असुन शेजारी माझ्या दिराचे घर आहे.

त्या दिवशी दुपारचे १.०० वाजण्याच्या सुमारास मी घरी एकटे होते. मी तेव्हा घराची साफ सफाई करीत होते. माझा दिर मयुर बाबर त्या वेळी घरात आला व मला म्हणाला की तुम्ही येथे कशाला आले, तुमचे काय काम आहे, तुमचे घर जेसीबीने पाडुन टाकेल. मी त्यास म्हणाले की हे आमचे घर आहे, मी येथे राहणार आहे, तु असे कसे करु शकतो. मी असे म्हणाला असता त्याने मला धक्का बुक्की केली व माझ्या साडीचा पदर ओढून मला स्वतःकडे ओढून घेतले, माझे खांदे व छाती दाबु लागला व मला लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले. मी आरडाओरड केला असता त्यावेळी माझे चुलत सासरे खंडु बाबर खिडकी मध्ये आले व मयुरला म्हणाले की असे काय करतो, तिला सोड, ती तुझी भाऊजाई आहे. माझा आवाज ऐकुन माझे सख्खे सासरे हनुमत बाबर तेथे आले. त्यांनी माझ्या हाताला धरुन मला घराच्या बाहेर ओढून काढले. त्यांनी मला शिवीगाळ केली. त्यानंतर मयुर बाबर व हनुमत बाबर तेथुन निघुन गेले. त्यानंतर मी

माझ्या पतीला फोनकरुन घटनेबाबत सांगुन घरी बोलवुन घेतले. त्यानंतर माझे पती आल्यावर आम्ही पारनेर पोलीस स्टेशनला रात्री ११.०० वाजण्याच्या दरम्यान गेलो व पोलीसांना घटनेबाबत सांगितले. आता मला फिर्याद दाखविण्यात आली. त्यावर माझी सही असुन त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.३०** देण्यात येते. त्यानंतर दुस–या दिवशी ९.०० वाजण्याच्या सुमारास पोलीस चौकशीसाठी आमच्याकडे आले होते. त्यांना मी ठिकाण दाखविले होते. माझ्या समक्ष पोलीसांनी पंचनामा तयार केला.

दि.१४/०९/२०२२ रोजी मी कोर्टात आले होते. तिथे माझा जबाब माझ्या सांगितल्या प्रमाणे घेतला होता. आता मला माझा कोर्टा समोर झालेला जबाब दाखविण्यात आला. त्यावर माझ्या तीन सहया असुन त्यातील मजकुर बरोबर असुन तो जबाब माझ्या सांगण्याप्रमाणे नोंदविला होता. त्यास नि.३१ देण्यात येते. आज रोजी दोन्ही आरोपी न्यायालयात हजर नाही. दोन्ही आरोपींना दाखविल्यास मी ओळखु शकते.

**सरतपास संपला.**

**आरोपी क्र.१ तर्फे वकील हजर असुन दोन्ही आरोपी गैरहजर असुन व आरोपी क्र.२ चे वकील गैरहजर असुन दोन्ही आरोपीतर्फे कुठल्याही स्वरुपाचा अर्ज दाखल केला नसल्याने विनाउलट तपास आदेश पारीत करण्यात येत आहे.**

श्रवणोत्तर स्वीकृती

NILESH SHRIPAL SABNIS Digitally signed by NILESH SHRIPAL SABNIS Date: 2025.07.31 11:04:06 +0530

(एन.एस.सबनीस)

दिनांकः२१/०५/२०२५. न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, कोर्ट नं.३,

पारनेर.

<u>**आर.सी.सी. क्र.४१८/२०२२ नि.२९**</u>

<u>**उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. एम.एल. औटी यांच्यामार्फतः**</u>

हे म्हणणे खरे आहे की आरोपी क्र.१ मयुर माझा सख्खा धाकटा दिर आहे, आरोपी क्र.२ सासरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की माझे पती उत्तम थोरले असुन मयुर धाकटा आहे. हे म्हणणे खरे आहे की माझे पती सन २००४ पासुन व दिर मयुर सन २०११ पासुन भारतीय सैन्य दलात आहेत. माझा सन २००८ साली विवाह झाला व

मी माझ्या सासरी वडनेर बुद्रुक येथे नांदायला गेले. मी सन २००८ ते २०११ पर्यंत वडनेर बुद्रुक येथे राहीले. मयुरचा विवाह कधी झाला हे माझ्या लक्षात नाही. मी सांगते की मयुरचा विवाह झाल्याच्या १५ दिवसानंतर आम्ही घर सोडले होते. पहील्यापासुन मयुर व आमच्यामध्ये संबंध ठिक नव्हते. मयुरचा विवाह झाल्यानंतर मयुर व आमच्यामध्ये वाद वाढायला लागले होते. हे म्हणणे खरे आहे की मयुरची पत्नी ही मयुरचे व माझ्या पतीच्या मामाची मुलगी होती.

प्रश्न– मयुरची पत्नी घरात आल्यापासुन तुमच्यामध्ये तक्रारी चालु झाल्या?

उत्तर– तिच्याशी माझा काही वाद नव्हता. लग्न झाल्यापासुन तक्रारी चालु होत्या.

हे म्हणणे खरे आहे की लग्न झाल्यानंतर सत्यनारायणची पुजा होण्यापुर्वी मी माझ्या पतीसोबत मुंबईला गेले होते व त्यानंतर आम्ही अहमदनगरला आलो होतो. हे म्हणणे खरे नाही की आम्ही नगरला असताना आमचे सासरे धान्याचे पोते आम्हाला पोहोच करत होते.

प्रश्न– तुमच्यामध्ये चांगले संबंध असताना फौजदारी केसेस होईपर्यंत घरात कशामुळे वाद झाले?

उत्तर– आम्ही आधी गावी येत नव्हतो. लग्न असताना आम्ही एक दोन दिवसांसाठी गावी यायचो. कोरोना नंतर आम्ही पाच सहा महीने गावी राहायला आलो असल्याने व आम्ही गावी पाच सहा महीने राहीलो असल्याने आमच्यात वाद झाले.

हे म्हणणे खरे नाही की कोरोनामध्ये गावी रहायला येण्यासाठी मला व माझ्या पतीस माझ्या सासु सास–याने सांगितले. हे म्हणणे खरे आहे की कोरोना काळात आम्ही गावी रहायला आल्यावर सन २०२१–२२ पर्यंत गावी राहीलो. मी सांगते की मुलांच्या परिक्षेसाठी मी मधुन अहमदनगर येथे जायचे. कोरोना संपल्यानंतर आम्ही नगर येथे राहण्यास गेलो.

प्रश्न– मधल्या काळात सासु सासरे, दिर व पती यांच्यामध्ये काही जमिनीवरुन वाद झाला का?

उत्तर– नाही. मी सांगते की ते आम्हाला गावी राहु द्यायचे नाही.

मधल्या काळात सन २०२१ साली माझे पती, दिर व सासरे यांच्यामध्ये जमिनीचे वाटप झाले होते. हे म्हणणे खरे आहे की ते वाटप माझे सासु, सासरे, दिर व पती यांनी वकीलामार्फत करुन घेतले. हे मला सांगता येणार नाही की त्या वाटपात

जमिन गट नं.८५३ व ४६७/१ दोन्ही भावांमध्ये वाटुन दिल्या होत्या किंवा कसे. सासु सासरे यांनी त्यांच्याकडे काही जमिनी खाण्याकरीता ठेवल्या होत्या का याबाबत मला माहीत नाही.

प्रश्न– घरासाठी वाटप कसे झाले?

उत्तर– तीन खोल्या होत्या. त्यापैकी एक खोली सास–यांकरीता, एक खोली दिराकरीता व एक खोली माझ्या पतीकरीता ठेवली कारण आम्हाला आरोपी गावी राहु देत नसल्यामुळे आमच्यासाठी काही तरी असावे म्हणुन आम्ही एक खोली घेतली.

हे म्हणणे खरे नाही की माझ्या पतीला एक खोली व सासु सास–यांना एक खोली व मयुरला गोठयाची जागा दिली होती. मी सांगते की मयुरला चांगली खोली करण्यासाठी त्यास पैसे दिले होते. हे म्हणणे खरे आहे की त्या वाटपात मयुरला चांगली खोली करण्यासाठी माझ्या पतीने त्यास रु.१,७५,०००/– देण्याचे ठरले होते. मी सांगते की ते पैसे दिले पण होते. हे मला माहीत नाही की जसे वाटप झाले आहे त्याप्रमाणे जो तो आपआपली जमिन वहिवाटत आहे किंवा कसे. त्या जमिन आज चालु आहेत का हे मला माहीत नाही. वाटपानंतर वडनेर येथे आमचे येणे जाणे होते. हे माझ्या लक्षात नाही की कोण कोणाची जमिन करीत होते. हे मला सांगता येणार नाही की जे वाटप झाले त्या वाटपाशी माझे पती समाधानी होते किंवा कसे. मी सांगते की ते माझ्या पतीला सांगता येणार.

उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृती

NILESH SHRIPAL SABNIS Digitally signed by NILESH SHRIPAL SABNIS Date: 2025.07.31 11:04:15 +0530

(एन.एस.सबनीस)

दिनांकः३०/०७/२०२५.

न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, पारनेर